ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षक शिक्षणातील ई-अध्ययनाचे शत्रुसंधो(SWOT Analysis)विश्लेषण

संशोधक - सहा. प्रा. महादेव सांगळे, सहा. प्रा. संदीप गाडेकर
अध्यापक महाविद्यालय, वडगांव मावळ जि पुणे.
sandeep.gadekar23@yahoo.co.in

**सारांश :**

ई - अध्ययन ही संकल्पना ई-तंत्राचा वापराद्वारे होणारे अध्ययनाशी निगडीत आहे. भारतात विशेष करून शिक्षक शिक्षणात या संकल्पनेचा मोठा प्रभाव पडलेला आपणाला दिसून येतो. संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत सर्वच टप्प्यांवर ई - अध्ययन सर्व मानवी संसाधनांना उपयोगी पडत आहे. या नवीन संकल्पनेचा स्विकार शिक्षक शिक्षणातील सर्वच घटकांनी केलेला आहे. आजचा 'विदयार्थी - शिक्षक ' यालाच नव्हे तर शाळा, महाविदयालये,विदयापीठे,संस्थाचालक सर्वांनाच याची भूरळ पडलेली आहे. विदयार्थ्यांचा व शिक्षणप्रक्रियेचा सर्वांगिण व संपूर्ण गुणवत्ता विकास व्यवस्थापनाच्या दृष्टीने ई अध्ययन संकल्पना, वैशिष्टये, प्रकार, प्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधनात शिक्षक शिक्षणातील ई अध्ययनाचे अल्बर्ट हंपी या तज्ज्ञ संशोधकाच्या शत्रुसंशो ( SWOT Analysis ) विश्लेषण करुन शक्तीस्थाने (Strengths) त्रुटी (Weakness) संधी (Opportunity) धोके (Threats) यांचे विश्लेषण केले आहे.

**Key Words :**शिक्षक शिक्षण, ई अध्ययन,शत्रुशंधो विश्लेषण(SWOT).

**प्रास्ताविक :**

भारतात तंत्रज्ञान व ई अध्ययनाचे युग हे ख-या अर्थाने १५ ऑगस्ट १९९५ पासून सुरु झाले त विदेश संचार निगम लि. या संस्थेमुळे ज्यांनी संपूर्ण भारतात इंटरनेट सर्वांसाठी अधिकृतपणे उपलब्ध करुन दिले. तेव्हा पासून आजपर्यंत इंटरनेट, वेबसाईट, माहितीचा खजिना व माहिती तंत्रज्ञान सर्वच आघाडीच्या क्षेत्रांमध्ये उदा. सरकारी कार्यालय, विदयापीठे, संशोधन संस्था, वृत्तसंस्था, शेअर बाजार, दूरशिक्षण संस्था या मध्ये झपाटयाने प्रचार व प्रसार झालेला दिसून येतो.

शिक्षण क्षेत्रामध्ये प्रामुख्याने शिक्षक शिक्षणात ( डी. एड्., बी.एड्., एम.एड्., एम.फिल्., पीएच.डी. )याचा वापर अध्ययन अध्यापन अभ्यासक्रम वितरण करण्यासाठी पदवीप्राप्तीसाठी, परीक्षा घेण्यासाठी, विदयार्थ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी संशोधनात शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी मोठया प्रमाणात केला जात आहे. भारत सरकारने $11^{th}$ Plan मध्ये ४४७ कोटी रुपयांची तरतुद तंत्रज्ञान व ई अध्ययनासाठी केलेली आहे. तसेच राष्ट्रीय मिशन मध्ये माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान यामध्ये २०० कोटी ई अध्ययनासाठी तरतूद केलेली आहे. भारताला २०२० साली आर्थिक, शैक्षणिक, विज्ञान, तंत्रज्ञान या क्षेत्रात महासत्ता करावयाचे असेल तर तंत्रज्ञान व ई अध्ययन या क्षेत्रावर शासनाने आणखी तरतूद करणे आवश्यक आहे. कारण Today's investment in Education is the tomorrows interest. असे महात्मा गांधीनी म्हटलयाप्रमाणे हे विधान सत्यात उतरताना दिसत आहे.

**ई - अध्ययन संकल्पना :**

ई-तंत्रज्ञानाचा वापर अध्ययन- अध्यापनात ज्ञानाचे आदान-प्रदानासाठी करणे म्हणजे ई - अध्ययन होय.

The use of Network Technologies to create , foster, deliver & facilitate learning , any time any where.

The convergence of the internet & learning or internet – enabled learning.

**ई - अध्ययनाचे उदिदष्टे :**

१ अध्ययन खर्च करणे.

२ अभ्यासक्रम वितरणाची जबाबदारी वाढविणे.

३ वर्गातील प्रशिक्षणाची गरज कमी करणे.

४ प्रशिक्षणाची शैक्षणिक व्यवस्थापनाशी सांगड घालणे.

५ अध्ययनार्थींचा विकास करणे.

६ अध्ययन अध्यापन प्रक्रीयेतील वेळ कमी करणे.

७ शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे.

८ शैक्षणिक उदिदष्टांचा पाठपुरावा करणे.

९ अध्ययन पाहिजे त्याला पाहिजे तेथे उपलब्ध करुन देणे.

१० अध्ययन प्रकिया प्रभावी करणे.

**ई - अध्ययनाचे मार्ग :**

१ वेब आधारीत अध्ययन (Web based)

२ संगणक आधारित अध्ययन (Computer based )

3 Digital collaboration

४ चित्रिकरणाव्दारे परिषद (Video conference )

५ दुरस्थ शिक्षण कार्यक्रम (Distance Education programme )

**ई - अध्ययन तंत्राचे वापरातील प्रकार :**

१ ऑनलाईन (Online )

२ ऑनलाईन व समारासमोर चर्चा (Online & face to face )

३ गटामध्ये अध्ययन (Synchronous)

४ विदयार्थी - विदयार्थी (Asynchronous )

५ मार्गदर्शक - विदयार्थी (Instructor led group)

६ स्वयं-अध्ययन (Self study)

७ विषय तज्ज्ञांबरोबर स्वयं-अध्ययन (Self study with subject expert)

८ वेब आधारित (Web based learning )

९ व्हिडीओ / ऑडीओ टेप (Video-Audio tape )

१०संगणक आधारित (Computer based)

## ई अध्ययनाचे शत्रुसंधो विश्लेषण ( SWOT Analysis ) :

| **अ.नं.** | **शक्तीस्थाने (Strength)** | **संधी (Opportunity)** |
|---|---|---|
| १ | संगणक व इंटरनेट कौशल्यांचा विकास घडतो. | मानवी क्षमतेचा विकास करता येईल |
| २ | सोयीनुसार शिक्षण | सर्वांसाठी शिक्षण |
| ३ | स्थळ, वेळ, वयाचे बंधन नाही | घर बसल्या पदवी |
| ४ | मानवी संसाधनांची बचत | बी. पी. ओ. कॉलसेंटर मध्ये संधी |
| ५ | परीक्षेचे भय कमी | मूल्यमापनात वस्तुनिष्ठता |
| ६ | भरपूर सराव | मागणीनुसार परीक्षा |

| | | |
|---|---|---|
| ७ | अभ्यासक्रमात लवचिकता | अभ्यासक्रम निवडण्यास संधी |
| ८ | कागदरहित कामकाज | पर्यावरण संरक्षण |
| ९ | २४/७ उपलब्धता. | दुरस्थ शिक्षण घेण्याची व्यवस्था |
| १० | आभासी अध्ययन वातावरण | आभासी वर्गांची निमिर्ती |
| ११ | अनुभवांचे इतरांशी आदान-प्रदान | संगणक साक्षरता वाढविता येईल |
| १२ | प्रभावी सुसंवाद व अध्ययनार्थी - मार्गदर्शक आंतरक्रिया. | जगातील प्रमुख विदयापीठांचा ऑनलाईन पदवी, सर्टिफिकेट व वैयक्तिक कोर्स सुरु करण्यावर भर. |
| १३ | ई - साधनांचा पुरेपुर वापर | माहितीची उपलब्धता |
| १४ | स्वयं-अध्ययनास दिशा प्राप्त होते. | सारख्याच गुणवत्तेच्या आशयाचे सर्वांना वितरण |
| १५ | अभ्यासक्रम विदयार्थी केंद्रित आहे. | सारख्याच गुणवत्तेचे सर्वांना शिक्षण |
| १६ | पारंपारिक अध्ययना पेक्षा जास्त सातत्याची हमी देणारा ई अध्ययनाचा मार्ग. | पारंपारिक शिक्षण पदधतीला पर्याय |
| १७ | भौगोलिक मर्यादाना स्थान नाही. | जागतिक पातळीवर नोकरीच्या संधी |
| १८ | प्रवास,शैक्षणिक व निवास खर्च बचत | वेळ व पैसा वाचविता येईल |
| | **त्रुटी (Weakness)** | **धोके (Threats)** |
| १ | तज्ज्ञांची कमतरता, सर्व शिक्षकांना सदर प्रणालीचे हस्तकौशल्य नाही | अप्रशिक्षित व्यक्तींना कमी केले जाऊ शकते |
| २ | नविन तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, ग्रामीण भागात उदासिनता | ई अध्ययन देणे अवघड |
| ३ | जोडणी संदर्भात भौतिक साधन सुविधांचा अभाव | ई अध्ययन करता येणार नाही. |

| | | |
|---|---|---|
| ४ | प्रत्येक विदयार्थ्यास स्वतंत्र संगणक व तत्सम सुविधा पुरविणे अशक्य | सायबर गुन्हेगारीत वाढ |
| ५ | प्रशासकीय मर्यादा उदा. शासनाची काही हार्ड व सॉफटवेअर वापरावर असलेली मर्यादा | चुकीच्या वेबसाईटस किंवा अनावश्यक माहिती पाहणे |
| ६ | अंमलबजावणी व दुरुस्ती खर्च | प्रणाली बंद पडणे |
| ७ | भावनिक विकासाचा अभाव | केवळ बोधात्मक व क्रियात्मक क्षेत्राचा विकास |
| ८ | सक्षम सॉफटवेअर व हार्डवेअरची आवश्यकता | प्रक्रियेत अडथळे |
| ९ | संगणक निरक्षरता | प्रतिसाद मिळणार नाही |
| १० | लोडशेडिंग | वेळेत काम होणार नाही |

**ई अध्ययन निर्मितीसाठी शिफारशी :**

**विदयार्थी :**

स्वतः दिशादर्शक व्हा.

स्वतः प्रेरणा घ्या.

स्वयं शिस्त पाळा.

आजीवन शिक्षण घ्या.

**शिक्षकः**

ज्ञान व कौशल्यांचा विकास करा.

ई-अध्ययन आणि त्याची गरज समजून घ्या.

अध्ययनाच्या संधी उपलब्ध करुन दया.

**ई-अध्ययन निर्मिती**

**प्रशासक :**

अध्ययनाचे वातावरण तयार करा.

आय. सी. टी. साधन सुविधा पुरवा.

**संभाव्य धोके टाळण्यासाठी उपाय :**

१ सर्व मानवी संसाधनांना संगणक, तंत्रज्ञान वापराचे प्रशिक्षण दयाचे लागेल.

२ ग्रामीण भागातील समाजाचे ई अध्ययन विषयक उद्‌बोधन करावे लागेल.

३ प्रशिक्षक तज्ज्ञांची संख्या वाढवावी लागेल.

४ सायबर गुन्हेगारी वर नियंत्रण ठेवावे लागेल.

५ अनावश्यक वेब साईटस् वापरण्यावर बंदी घालावी.

६ अमंलबजावणी व दुरुस्ती खर्चाची तरतूद, शासन, संस्थाचालक यांनी करावी.

७ भावात्मक क्षेत्राचा विकासावर भर दयावा लागेल.

८ सक्षम Software & Hardware ची निर्मिती / आयात करावी लागेल.

९ सर्वांना संगणक साक्षर करावे लागेल.

१० विजेचा वापर मर्यादीत करावा लागेल.

**संदर्भसूची :**

चव्हाण कि.,(२०१०),‘**माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान’,** नाशिक,इनसाईट पब्लिकेशन.

पाटील वि.वि.,(२०१०),‘**प्रगत संगणक तंत्रज्ञान आणि शिक्षक’,**नाशिक,इनसाईट पब्लिकेशन.

तापकीर द.,लोंढे गौ.,(२०१०),‘**विदयमान शिक्षणातील नव-विचार प्रवाह**’,मिरज संघमित्रा प्रकाशन.

http://www.google.com/e-learning /The future of e-learning in India - Express Computer.html.

http://www.google.com/e-learning /mission document_20feb09.pdf.

http://www.google.com/e-learning/rep-csir pdf.

http://www.google.com/e-learning /policy-issues.pdf.